# छत्रपती शाहू आणि लोकमान्य टिळक: समतुल्य व्यक्तिमत्व आणि परस्पर संबंध

**डॉ. ज्योती जयवंत व्हटकर,** सहयोगी प्राध्यापक (इतिहास विभाग प्रमुख), यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी. ता.चंदगड जि. कोल्हापूर (शिवाजी विद्यापीठ, संलग्न), मो.नं.९८८१२२९९२१, ९४२३४०९९२१

ई मेल :jyotivatkar13@gmail.com

---

**प्रस्तावना** : लोकमान्य टिळक हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक अग्रेसर नेते होते. ते स्वतंत्र वृत्तीचे राजकीय पुढारी होते. हिंदुस्थात हा राजकीयदृष्ट्या स्वावलंबी बनला पाहिजे. स्वतंत्र असला पाहिजे ही टिळकांची प्रथम विचारसरणी होती तर लोकशाही स्वराज्य तर हवेच पण त्याआधी ते उपभोगण्यासाठी व राबण्यासाठी जनतेत पात्रता आली पाहिजे व त्यासाठी बहुजन समाजात जागृती झाली पाहिजे या उद्देशाने प्रेरित होवून समाज उध्दारचे कार्य हाती घेणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते. म्हणजेच लोकमान्य टिळक यांनी प्रत्यक्ष राजकारणात सहभाग घेतला होता तर राजर्षी शाहू महराज हे राजकारणात प्रत्यक्ष भाग घेत नव्हते तरी महाराष्ट्रात ते अप्रत्यक्षपणे सामाजिक क्षेत्रातील लोकमान्य टिळकांचे प्रतिस्पर्धी म्हणून मानण्यात येत असत. या दोन्ही महान नेत्यांनी आपआपल्या विचारसरणीचा शेवटपर्यंत पुरस्कार केला. या भिन्न व्यक्तिमत्वांची विचारसरणी भिन्न होती मात्र या दोघांचाही विविध कारणांमुळे एकमेकांशी संबंध आला होता. त्या विविध कारणांचा उहापोह करून या दोन समतुल्य असणा-या व्यक्तिमत्वा विषयीची मांडणी करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखनातून केलेला आहे.

**कोल्हापूर आणि लोकमान्य टिळकयांचा संबंध दर्शिविणारी काही उदाहरणे** :

• कोल्हापूरच्या गादीशी टिळकांचा संबंध आला होता. त्यांनी कोल्हापूरचे छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांची बाजू घेणारे लेख मराठा मधून प्रसिध्द केले होते तेव्हा.

• २ एप्रिल, १८९४ मध्ये शाहू महाराज गादीवर बसले तेव्हा केसरी वर्तमानपत्रातून ‘कपिलाषष्ठीचा योग’ असा अग्रलेख लोकमान्यांनी लिहून छत्रपतींचे जणू अभिनंदनच त्यांनी केले होते. या अभिनंदनपर लेखातून लोकमान्यांनी कोल्हापूरशी पर्यायी छत्रपती शाहूंसोबत दुस-यांचा संबंध आला.

• तिस-यांदा म्हणजे छत्रपतींच्या शिवाजी महाराजांच्या पुतळा जीर्णोद्धाराठी १८९५ मध्ये पुण्यातील एक शिष्टमंडळ शाहूंना भेटायला आले होते. त्यावेळी लो. टिळकही या शिष्टमंडळासोबत होते. या तीन प्रसंगामधून लोकमान्य टिळक आणि राजर्षी छ. शाहू महाराज यांचा प्राथमिक संबंध आला होता. पण पुढील काळामध्ये काही मोठी प्रकरणे घडली आणि त्यातून या दोघांमधील राजकीय संबंध बिघडलेले दिसतात.

**वेदोक्त प्रकरण** :

वेदोक्तचा अधिकार म्हणजे हिंदू धर्मातील सोळा संस्कार आणि इतर धर्म कार्ये वैदिक मंत्रांनी करण्याचा अधिकार. काळाच्या ओघात वर्चस्वासाठी ब्राम्हणांनी जगात फक्त ब्राम्हण व शुद्र असे दोन वर्ण असल्याने जाहीर केले होते. प्रथम दर्जाचे वेदातील मंत्र ब्राह्मणासाठी व पुराणातील दुय्यम मंत्र शुद्रांसाठी. कोल्हापूरमध्ये इ. स. १८९९ मध्ये वेदोक्त प्रकरण घडले. वेदोक्त हा शाहू महाराजांचा उत्क्रमणशील जीवनातील एक महत्वाचा टप्पा होय. वेदोक्त प्रकरणामुळे या दोन्ही नेत्यांमध्ये असंतोषाची लाट पसरली. शाहू महाराजांनी आपणास वेदोक्त विधींचा अधिकार आहे असे म्हटले. यामुळे करवीरकर ब्रम्हवृंद नाराज झाला. इतकेच नव्हे तर पुढे या संदर्भात कोल्हापूमध्ये लहान मोठे उद्रेक ही झाले. उदा.छ. शाहू महाराजांच्या आई आनंदीबाई राणीसाहेब यांच्या मृत्यूनंतरचे विधी, मुख्य पुरोहित आप्पासाहेब राजोपाध्ये यांचा राजवाड्यातील धर्मकृत्ये करण्यास असणारा विरोध इ. कारणामुळे वातावरण अजूनच बिघडले.. सर्व ब्राम्हणवृदांनी लोकमान्य टिळक अन्य कामासाठी कोल्हापूरला आले होते. त्यांना या प्रकरणात पुढे केले. वास्तविक लोकमान्य टिळक हे छ. शाहू महाराजांची बाजू घेतील अशी महाराजांना आशा होती. मात्र उघड उघड टिळक महाराजांच्या विरोधात गेले. वेदोक्त बाबत लो. टिळकांनी आडवळपणाने आपले मुद्दे मांडले आणि त्यातून छत्रपतींना वेदोक्ताचा अधिकार नाही असे स्पष्ट केले. महाराष्ट्रात दोन-तीन दशके गाजलेल्या ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर वादाची बीजे याच काळात रोवली गेली होती. जर लो. टिळकांनी सामोपचाराची व उदार भूमिका घेतली असती तर हा वाद विकोपाला गेला नसता. या दोन्ही द्रष्ट्या नेत्यांच्या आयुष्यातील सहा ते सात वर्षे यामध्ये खर्ची गेली. या प्रकरणानिमित्त महाराजांनी गव्हर्नर नॉर्थकॉट याची भेट घेतली. लो. टिळकांनी केसरीतून ‘वेदोक्ताचे खूळ’ अशा प्रकारचे १९०१ मध्ये लेख लिहून हे प्रकरण अधिकच तीव्र बनत असल्याचे स्पष्टीले. पुढील काळात करवीर धर्मपीठ आचार्य शंकराचार्यांनी छत्रपतींच्या बाजूने निर्णय देऊन सभेमार्फत ब्रम्हवृंदासमोर

छत्रपतींचा अधिकार मान्य केला. या वेदोक्त प्रकरणातून ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर वाद महाराष्ट्रात अधिक वाढला. शाहू हे ब्राम्हणांचे व्देष्टे आहेत हे चित्र निर्माण झाले.

**ताई महाराज प्रकरण** :

लो. टिळकांचे स्नेही वासुदेव हरी उर्फ बाबा महाराज पंडित हे पुण्यात राहत होते. पुणे, बेळगाव, सोलापूर, कोल्हापूर या जिल्ह्यात त्यांची मालमत्ता होती. त्यांच्या पहिल्या पत्नीच्या निधनानंतर त्यांनी सिन्नरकर नावाच्या एका पुस्तक विक्रेत्याच्या रूपवान मुलीशी विवाह केला. तिचे नाव सकवार बाई उर्फ ताई महाराज. ७ ऑगस्ट, १८९७ रोजी बाबा महाराज यांचे निधन झाले. त्यावेळेस ताई महाराज गरोदर होत्या. बाबामहाराजांच्या आजारपणा दरम्यान लो. टिळक त्यांना भेटावयास गेले. त्यांनी मुत्युपत्र करण्याचा सल्ला त्यांना दिला होता. आपल्यामागे या मालमत्तेला सांभाळण्यासाठी विश्वस्त नेमणे बाबामहाराजांना आवश्यक वाटले व त्यातून त्यांनी लो. टिळक यांना याबाबत विनविले. लोकमान्यासोबत अमरावती, नागपूर, कोल्हापूर, औरंगाबादचेही नेमस्त होते. ताई महाराज यांचे अपत्य अल्पायुषी ठरल्याने नेमस्तांनी औरंगाबादमधील मुलगा दत्तक घेऊन ताई महाराजांचीही त्यांना मान्यता घेतली. याला कोल्हापूर दरबाराचीही संमती आवश्यक होती कारण बाबामहाराजांची काही संपत्ती कोल्हापुरात होती. मात्र नागपूरकरांच्यामुळे ताई महाराजांचे मनपरिवर्तन झाले आणि त्यांनी औरंगाबादचा दत्तक मुलगा जगन्नाथ बाबत आपल्यावर सक्ती झाल्याने तो अमान्य करून बाला महाराज या नवीन दत्तकाच्या मान्यतेबाबत विनंती केली. टिळकांनी हे दत्तक विधान बेकायदेशीर असल्याने ते थोपविण्याचा प्रयत्न आरंभिला .टिळकांवर खोटी साक्ष व कागदपत्रे करणे असा आरोप झाला. १९०१ मध्ये टिळकांनी ताई महाराज व बाला महाराज यांच्या विरुध्द कोर्टात दावा दाखल केला. १९०३ मध्ये टिळकांना दीड वर्षे सक्तमजुरी व एक हजार दंड झाला. टिळकांनी हायकोर्टात अपील केले व त्यांना न्याय मिळाला.

ताई महाराज प्रकरणात छ. शाहू महाराज हे टिळकांच्या विरोधात होते. या प्रकरणात केवळ आणि केवळ ब्रिटीश अधिका-यांच्या दडपणामुळे ते टिळकांच्या विरोधात गेले असे म्हटले तर ती अतिशयोक्ती नसावी.

**चिरोल प्रकरण** :

चिरोल प्रकरण हे पुन्हा एकदा छ. शाहू व लोकमान्य यांच्यातील वैचारिक, तात्विक किंवा राजकीय मतभेद दर्शविणारे होते. टिळक मंडालेच्या तुरुंगात असताना चिरोल यांनी 'इंडियन अनरेस्ट' हा लिहिलेला ग्रंथ त्यांना पहावयास मिळाला. त्या ग्रंथात आपल्याविषयी अनेक चुकीची विधाने त्यांना नंतर वाचताना आढळली आणि त्यांनी १९१५ मध्ये चिरोलवर अब्रुनुकसानीचा दावा ठोकला. या खटल्यामध्ये टिळकांची हार झाली. या ही प्रकरणात छत्रपती शाहू महाराज हे टिळकांच्या विरोधी उभे राहीले. अर्थात नक्कीच ब्रिटीशांच्या दडपणापोटी.

**शिवाजी चळवळ/क्लब** :

शिवाजी क्लब ही संघटना कोल्हापुरातील सुशिक्षित ब्राम्हण तुरुणांनी स्थापन केलेली संघटना प्रारंभी छ. शिवाजींच्या नावे चालना-या संघटनेला समाज विधायक कार्यास मदत करावी हा शाहूंचा हेतू होता.मात्र पुढे लो. टिळक प्रणीत शिवाजी चळवळीला राजकीय झालर दिसू लागली. पुढील काळात शिवाजी क्लब हा फक्त ब्राम्हण दहशतवादी गट बनला होता. या गटाला लो. टिळकांचा आशीर्वाद होता. छ. शाहूंनी जेव्हा या दहशतवादी हालचालींना आळा घालण्यासाठी सभाबंदीचा हुकुम जारी केला, तेव्हा लो. टिळकांनी आपले कठोर टीकास्त्र केसरीतून सोडले होते. त्यात ते म्हणतात-'शिवाजींच्या वंशातल्या छत्रपतींनी ब्रिटीशांच्या पावलावर पाऊल टाकून इंग्रजी कायद्याच्या धर्तीवर जाहीरनामा काढावा, हे तिरस्करणीय आहे. कोल्हापूर राज्यात असे काय गूढ आहे. अथवा राजद्रोह चालला आहे की, ज्याचा बंदोबस्त इंग्रजांचे अनुकरण केल्याशिवाय करता येत नाही. महाराज आमचे शत्रू की आम्ही महाराजांचे शत्रू ह्याचा निकाल कधीतरी लागल्याशिवाय राहणार नाही'.

वर नमूद केलेली ही प्रकरणे यातून लो.टिळक व छ.शाहू महाराज यांच्यातील राजकीय वाद अधिक स्पष्ट होताना दिसतो. ही कटुता कायमस्वरूपी नव्हती.संबधित प्रकरणापर्यंतच मर्यादित होती. पण दोघाच्याही मनात एकमेकांविषयी आदर व विश्वासाची भावना होती. छत्रपतींना राजकीय स्वातंत्र्याबद्दल खूप आस होती केवळ ब्रिटीशांच्या मांडलिकत्वाच्या बंधनामुळे ते देशाबाबत किंवा क्रांतिकारकांबाबत उघडपणे सहकार्याची भावना दर्शवित नव्हते.

**परस्पर आर्थिक सहकार्य दर्शिविणारी काही उदाहरणे**:

• १९०२ ते १९०४ च्या दरम्यान लो. टिळकांच्या प्रेरणेने त्यांचे सहकारी काकासाहेब खाडिलकर हे नेपाळमध्ये जाऊन जर्मन तंत्रज्ञाच्या सहकार्याने बंदुकीचा कारखाना सुरु करण्याच्या प्रयत्नात होते. यांना लागणारे आर्थिक सहाय्य शाहू महाराजांनी पुरविले होते.

• १९०३ ते १९०८ या कालावधीत लो. टिळकानी एक गुप्त संघटना स्थापन केली होती. या संघटनेला आर्थिक मदत म्हणून दरवर्षी छ. शाहू महाराज पाचशे रुपये पाठवीत होते.

• याच सोबत छ. शाहू आपल्या विश्वासातील अधिकारी बाजीराव विचारे यांच्याकडून ब-याच रकमा टिळकांकडे पाठवीत असत.

स्वातंत्र्याच्या उदात्त ध्येयाने प्रेरित झालेल्या सशस्त्र क्रांती कारकांना विविधांगी सहकार्य करणे हे छ. शाहू महाराज आपले राष्ट्रीय कर्तव्य मानत. या आर्थिक सहाय्यासोबतच शाहू महाराज आपल्या पद्धतीने टिळकांना नेहमीच सावध करण्याचा किंवा त्यांना सहाय्य करण्याचा गुप्त रीतीने प्रयत्न सुद्धा करत असत.

**परस्पर ममत्व दर्शिविणारी काही उदाहरणे** :

• चिरोल प्रकरणात शाहूंचा लोकमान्यांना विरोधाच होता पण देशासाठी झटणा-या लो. टिळकां बाबत त्यांनी सहकार्य दर्शवून आपल्या ताब्यात असणारी महत्वाची पत्रे लो. टिळकांकडे पाठवून दिली होती.कोणत्याही पद्धतीने टिळकांना अडचणीत आणावयाचे नसल्याचे सांगून वैर तेवढ्यापुरते असावे असे स्पष्ट केले. यातून त्यांची टिळकांप्रती सहकार्याची भावना दिसते.

•१९१४ मध्ये लो. टिळकांची मंडालेच्या तुरुंगातून सुटका झाल्यानंतर मुंबई सरकारने परिपत्रकाव्दारे सर्व प्रतिष्ठीत व्यक्तींना टिळकांची भेट घेणे हा गुन्हा समजून शिक्षेचा इशारा दिला होता. पण तरीही छ. शाहूंनी लो. टिळकां समवेत अंतस्थ संबंध ठेवून धोका पत्करला होता.

•परस्परांबाबत विश्वासाची प्रचंड भावना दोघांच्यात होती.याचे एक उदाहरण म्हणजे लो.टिळक यांनी मंडालेच्या तुरुंगात लिहिलेल्या गीतारहस्य या ग्रंथाचे हस्तलिखित आणण्याची जबाबदारी मुंबई सरकारने छ.शाहू महाराजांवर सोपवली होती .ते हस्तलिखित लो. टिळकांनी दिवाणखान्यातील मंडळींचा विरोध असतानाही केवळ महाराजांवरील विश्वासापोटी त्यांच्या ताब्यात दिली. राजकीय गोष्टी एकाबाजूला पण परस्पर विश्वास हा गाढा होता.

•१९२० मध्ये लो.टिळकांनी महाराजांना,"जॅक्सन आणि रॅड याप्रमाणे तुमच्या वाट्याला भवितव्य येईल." असा इशारा दिला असून ही कोणताही संताप व्यक्त न करता त्यांच्या बिघडलेल्या तब्येतीची अत्यंत काळजीपूर्वक विचारपूस करताना दिसतात. पुढे टिळकांच्या मृत्यूवार्तेने तर महाराज अस्वस्थ झाले होते. त्यादिवशी त्यांनी आपली सर्व नियोजित कामे बंद ठेवली होती. वरील सर्व बाबींवरून या दोन थोर पुरुषांमध्ये नक्कीच ऋणानुबंध असल्याचे जाणवते.

विविध इतिहासकारांनी दोहोबाबतची मते व्यक्त करताना काही वेळा प्रेम व अनेक वेळा व्देष असेच यांचे नाते होते, असे म्हटले आहे.

**विलोभनीय व्यक्तिमत्वे** :

या दोन महान नेत्यांमधील साम्य व भेद पाहण्यासारखा होता. या दोघांच्या वयात अठरा वर्षाचे अंतर होते. (छ. शाहू महाराज १८७४-१९२२ , लो. टिळक १८५६-१९२०) दोघेही वर्णाने श्यामल होते. छत्रपती शाहू पाच फुट सव्वा दहा इंच तर लोकमान्य टिळक पाच फुट अडीच इंचाचे होते. टिळक हे साध्या राहणीचे आणि उच्च विचारसरणीचे होते. छ. शाहू महाराजांची राहणी साधी होती. महाराज राष्ट्र उन्नतीसाठी उदार आणि उच्च विचार बाळगणारे होते. त्यांनी आपल्या राजमहालातील ऐश्वर्याचा त्याग करून मांजरपाटाचे जाडे भरडे भगवे सदरे परिधान केले होते. नक्षीदार पलंग आणि मऊ गाद्यागिरद्या यांचा त्याग करून ते खाटेवर कांबळे टाकून झोपत आणि कांदा भाकर खात असत. टिळकांचे ज्ञानाप्रसाराचे कार्य वरिष्ठ वर्गात घडले तर छत्रपतींचे शिक्षण कार्य बहुजन समाजासाठी घडले. दोघोंवरती निदकांनी चिखलफेक केली. टिळक म्हणत,' मी सकाळच्या चहा बरोबर वर्तमानपत्रातील शिव्या खात असतो,' तर महाराज म्हणत,' दोन सवयी मला लागल्या आहेत. अंग रगडून घेणे आणि बामणी वृत्तपत्रातील शिव्या खाणे.'

छ. शाहू बहुजन समाजाच्या उध्दार कार्यामध्ये रमत असत, तर लो. टिळक यांचे बहुजन समाजाबाबतचे धोरण कचखाऊ होते. जाती भेदाची चौकट मोडणे ही आवश्यकता टिळकांना जाणवत नव्हती तर जातीभेद मोडणे हे छ. शाहूंचे ध्येय होते. समाज सुधारणेच्या उद्देशाने विधीमंडळात आलेल्या विधेयकांना टिळकांनी विरोध केला तर सर्व विधेयकांना छत्रपतींनी पाठिंबा दिला.

**निष्कर्ष** : वरील सर्व बाबींचा विचार करता काही मुद्दे प्रकर्षाने समोर येतात.

•शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक हे महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात एकमेकांच्या समोर कटूर विरोधक म्हणून उभे राहीले तरी हा विरोध वैयक्तिक नसून तो तात्विक होता.

•काही प्रसंगामधून यांच्यातील विरोध तीव्र झालेला दिसला पण तो त्या प्रसंगापुरता मर्यादितच होता.

•छ. शाहू महाराजांनी लो. टिळकांना केलेला विरोध म्हणजे सार्वभौम इंग्रज सत्तेखालचे एक मांडलिक संस्थानिक असा होता.

•लोकमान्य टिळकांनी स्वराज्याचा मंत्र दिला तर छ. शाहू महाराजांनी सामाजिक समतेचे कार्य पुढे नेले.

•कोल्हापूरच्या गादीविषयी लो. टिळकांना कमालीची आदरभावना होती. म्हणूनच चौथ्या शिवाजी महाराजांवर होणा-या अन्यायाला त्यांनी वाचा फोडली आणि शिक्षा भोगली.

•लोकमान्य टिळक हे राजकारणातील शाहू होते तर छत्रपती शाहू महाराज हे नक्कीच समाजकारणातील लोकमान्य होते.

•लो. टिळकांनी राजकारण हेच आपले कार्यक्षेत्र निश्चित केले होते तर छ. शाहू महाराज यांनी आपले राजकीय कार्यक्षेत्र संस्थानिक म्हणून मर्यादित स्वरुपात स्विकारले होते. लो. टिळकांनी जसा राजकीय स्वातंत्र्य हा आपका जन्म सिद्ध मनाला त्याचप्रकारे छ. शाहू महाराजांनी सामाजिक स्वातंत्र्य हा आपला जन्मसिध्द हक्क मानला होता.

•लो. टिळकांना वैदिक संस्कृतीच्या व्दारे चालू असणा-या रूढी, परंपरा जपायच्या होत्या कारण यातच भारतीयांचे हित होते, तर छ. शाहू महाराज यांना विषमतेची भावना नष्ट करावयाची होती.

महाराष्ट्राच्या राजकारणातील हे दोन प्रगल्भ विचारचे नेते.दोघोंमध्ये राजकीयदृष्ट्या विरोध दिसतो पण परस्पर ममत्व निश्चितच होते.

**संदर्भ :**

१. किर धनंजय : राजर्षी शाहू छत्रपती – एक समाज क्रांतिकारक राजा पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७९

२. जाधव रमेश : राजर्षी शाहू छत्रपती : वर आणि वास्तव कोल्हापूर – १९०२

३. साळुंखे पी. बी.(संपा) - राजर्षी शाहू गौरव ग्रंथ- मुंबई १९७६

४. तोफखाने वा. द. – राजर्षी श्री. शाहू छत्रपती यांचे अंतरंग कोल्हापूर १९६३ महाराष्ट्र प्रकाशन

५. फडके य. दि. – शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक – श्री. विद्या प्रकाशन १९८६

६. केळकर न. चि. – लोकमान्य टिळक यांचे चरित्र - वरदा प्रकाशन, पुणे

७. फडके य. दि.- विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १ व २ पुणे

८. किर धनंजय – वक्ते श्री. शाहू स्मारक व्याख्यानमाला मार्च १९७० शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

९. लाटकरशाली वासुदेव आत्माराम – श्री. शाहू चरित्रम खंड २ अनु. डॉ. आ. ह. साळुंखे संपा डॉ. जयसिगराव पवार

१०. लठ्ठे आण्णासाहेब बाबाजी –श्री. छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र खंड १ (संपा) – डॉ. जयसिंगराव पवार, शाहू संशोधन केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

११. फाटक न. र. (वक्ते) – श्री. शाहू स्मारक व्याख्यानमाला मार्च १९७२ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१२. डॉ. पवार जयसिंगराव (संपा) – राजर्षी शाहू गौरव ग्रंथ महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर

१३. काशिद संतोष – गोवन वार्ता मधील लेख – लोकमान्य टिळक राजर्षी शाहू महाराज अव्दैताचे सांगाती ...१२ ऑगस्ट, २०२० (लो. टिळक स्मृती शताब्दी वर्षे )